| | |
|---|---|
| विषय क्र.०१. दि. ११ जानेवारी, २०२२. | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(ड) व कलम ७५ आणि सन २०११ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. १२ च्या आवश्यकतेनुसार रु. ५,००,०००/- पेक्षा जास्त परंतु रु. २५,००,०००/- पेक्षा कमी खर्चाच्या कामासंबंधी केलेल्या कराराबाबत दिनांक ३१/१२/२०२१ पर्यंतचा अहवाल मा. परिवहन समितीस सादर करणेबाबत, परिवहन व्यवस्थापक यांचे दिनांक ११/०१/२०२२, चे पत्र जा. क्र. नमुंमपा/परि/का.अ.(स्था.)/ ९७/२०२२. |
| ठराव क्र.१७२१ | "उपरोक्त संदर्भात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) व कलम ७५ आणि सन २०११ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. १२ च्या आवश्यकतेनुसार रुपये ५ लक्ष पेक्षा जास्त परंतु रु.२५ लक्ष पेक्षा कमी खर्चाच्या कामासंबंधी केलेल्या कामाच्या कराराबाबतचा अहवाल, प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) व कलम ७५ अन्वये मा. प्रशासक यांचे माहितीस्तव सादर करण्यात यावे." |
| निर्णय : | ठराव करण्यात येतो की,<br>महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) व कलम ७५ आणि सन २०११ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. १२ च्या आवश्यकतेनुसार रुपये ५ लक्ष पेक्षा जास्त परंतु रु.२५ लक्ष पेक्षा कमी खर्चाच्या कामासंबंधी केलेल्या कामाचा कराराबाबतचा अहवाल, सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले आहे.<br>त्यानुसार विषय क्रमांक ०१ ठराव क्रमांक १७२१ अन्वये प्रस्तावित केल्याप्रमाणे प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह केलेल्या कामांची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) व कलम ७५ अन्वये मा. प्रशासक यांचे माहितीकरीता सादर करण्यात येत आहे. |

सही/-
(चित्रा बाविस्कर)
नगरसचिव
नवी मुंबई महानगरपालिका

सही/-
(अभिजीत बांगर)
आयुक्त तथा प्रशासक
नवी मुंबई महानगरपालिका

| | |
|---|---|
| विषय क्र.०२.<br>दि. ११ जानेवारी, २०२२. | स्वच्छ भारत मिशन अंतर्गत नवी मुंबई महानगरपालिका शहरास कचरा मुक्त शहराचे ७ स्टार रेटींग प्राप्त करण्यास मान्यता मिळणेबाबत, आयुक्तांचे दिनांक १०/०१/२०२२, चे पत्र जा. क्र. नमुंमपा/उ.आ.(स्व.म.अं.)/१२/२०२२. |
| ठराव क्र.१७२२ | "उपरोक्त संदर्भात स्वच्छ भारत मिशन अंतर्गत नवी मुंबई महानगरपालिका शहरास कचरा मुक्त शहराचे ७ स्टार रेटींग प्राप्त करण्यास मान्यता मिळणेबाबत, प्रस्तावित केल्याप्रमाणे स्वच्छ भारत मिशन अंतर्गत कचरा मुक्त शहराच्या १ ते ७ स्टार मानांकनापैकी नवी मुंबई महानगरपालिका शहरास ७ स्टार मानांकन प्राप्त करण्याकरीता वृत्तपत्रात तसेच नवी मुंबई महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर जाहिर प्रकटन प्रसिध्द करुन नागरिकांच्या हरकती/सुचना मागविण्यात आल्या होत्या. तथापि, सदर बाबत विहीत कालावधीमध्ये नागरिकांकडून कोणत्याही प्रकारच्या हरकती/सुचना प्राप्त झालेल्या नाहीत. त्याअनुषंगाने स्वच्छ भारत मिशन अंतर्गत नवी मुंबइ महानगरपालिका शहरास कचरा मुक्त शहराचे ७ स्टार रेटींग प्राप्त करण्यास व त्यानुसार सदर प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यास प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह मा. आयुक्त तथा मा. प्रशासक यांची मान्यता देण्यात यावी.” |
| निर्णय : | ठराव करण्यात येतो की,<br>स्वच्छ भारत मिशन अंतर्गत नवी मुंबई महानगरपालिका शहरास कचरा मुक्त शहराचे ७ स्टार रेटींग प्राप्त करण्यास मान्यता मिळणेबाबत, सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले आहे.<br>त्यानुसार विषय क्रमांक ०२ ठराव क्रमांक १७२२ अन्वये प्रस्तावित केल्याप्रमाणे स्वच्छ भारत मिशन अंतर्गत कचरा मुक्त शहराच्या १ ते ७ स्टार मानांकनापैकी नवी मुंबई महानगरपालिका शहरास ७ स्टार मानांकन प्राप्त करण्याकरीता वृत्तपत्रात तसेच नवी मुंबई महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर जाहिर प्रकटन प्रसिध्द करुन नागरिकांच्या हरकती/सुचना मागविण्यात आल्या होत्या. तथापि, सदर बाबत विहीत कालावधीमध्ये नागरिकांकडून कोणत्याही प्रकारच्या हरकती/सुचना प्राप्त झालेल्या नाहीत. त्याअनुषंगाने स्वच्छ भारत मिशन अंतर्गत नवी मुंबइ महानगरपालिका शहरास कचरा मुक्त शहराचे ७ स्टार रेटींग प्राप्त करण्यास व त्यानुसार सदर प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यास प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह मा. आयुक्त तथा मा. प्रशासक यांची मान्यता देण्यात येत आहे. |

सही/-
(चित्रा बाविस्कर)
नगरसचिव
नवी मुंबई महानगरपालिका

सही/-
(अभिजीत बांगर)
आयुक्त तथा प्रशासक
नवी मुंबई महानगरपालिका

| | |
|---|---|
| विषय क्र.०३.<br>दि. ११ जानेवारी, २०२२. | कोरोना COVID १९ या साथरोगाच्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक उपाययोजनेसाठी संशयित रुग्णांच्या अलगीकरणाकरीता वाशी येथील सिडको एक्झिबीशन सेंटर येथे व्यवस्था करण्यात आलेल्या इमारतीमध्ये मनुष्यबळाद्वारे दैनंदिन साफसफाई व रुग्णांशी संबंधित इतर अनुषंगीन सर्व कामे करणेच्या वाढीव कालावधीबाबत, आयुक्तांचे दिनांक ११/०१/२०२२, चे पत्र जा. क्र. नमुंमपा/घकव्य./३३/२०२२. |
| ठराव क्र.१७२३ | "उपरोक्त संदर्भात कोरोना COVID १९ या साथरोगाच्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक उपाययोजनेसाठी संशयित रुग्णांच्या अलगीकरणाकरीता वाशी येथील सिडको एक्झिबीशन सेंटर येथे व्यवस्था करण्यात आलेल्या इमारतीमध्ये मनुष्यबळाद्वारे दैनंदिन साफसफाई व रुग्णांशी संबंधित इतर अनुषंगीन सर्व कामे करणेच्या वाढीव कालावधीबाबत, प्रस्तावित केल्याप्रमाणे सदर कामासाठी आवश्यकतेनुसार मा. आयुक्तांच्या मान्यतेने पुढील कालावधी वाढविण्यास व वाढीव कालावधीसाठी मे.डी.एम.इंटरप्रायजेस यांच्याकडून मंजुर दराने कामे करुन घेण्यास आणि त्यांच्यासोबत करारनामा करण्यास व होणा-या खर्चास प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये मा. आयुक्त तथा मा. प्रशासक (मा.स्थायी समिती) यांची मान्यता देण्यात यावी.” |
| निर्णय : | ठराव करण्यात येतो की,<br>कोरोना COVID १९ या साथरोगाच्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक उपाययोजनेसाठी संशयित रुग्णांच्या अलगीकरणाकरीता वाशी येथील सिडको एक्झिबीशन सेंटर येथे व्यवस्था करण्यात आलेल्या इमारतीमध्ये मनुष्यबळाद्वारे दैनंदिन साफसफाई व रुग्णांशी संबंधित इतर अनुषंगीन सर्व कामे करणेच्या वाढीव कालावधीबाबत, सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले आहे.<br>त्यानुसार विषय क्रमांक ०३ ठराव क्रमांक १७२३ अन्वये प्रस्तावित केल्याप्रमाणे सदर कामासाठी आवश्यकतेनुसार मा. आयुक्तांच्या मान्यतेने पुढील कालावधी वाढविण्यास व वाढीव कालावधीसाठी मे. डी. एम. इंटरप्रायजेस यांच्याकडून मंजुर दराने कामे करुन घेण्यास आणि त्यांच्यासोबत करारनामा करण्यास व होणा-या खर्चास प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये मा. आयुक्त तथा मा. प्रशासक (मा.स्थायी समिती) यांची मान्यता देण्यात येत आहे. |

सही/-
(चित्रा बाविस्कर)
नगरसचिव
नवी मुंबई महानगरपालिका

सही/-
(अभिजीत बांगर)
आयुक्त तथा प्रशासक
नवी मुंबई महानगरपालिका